DR. FIXIT WATERPROOFING EXPERT

Pidilite

# छताचे वॉटरप्रूफिंग (नवीन बांधकाम)



## हे कशामुळे होते ?

- काँक्रीट हे सच्छिद्र असल्यामुळे ते पाणी शोषून घेते आणि त्यामुळे पाण्याच्या गळतीला सुरूवात होऊ शकते.
- काँक्रीटमध्ये पाण्याचा खूप जास्त उपयोग केल्यास ते आक्रसते आणि त्याला भेगा पडतात. या भेगांमधून नंतर पाण्याची गळती सुरू होते.
- नवीन बांधकामांमध्ये, छताला तीक्ष्ण हवामानाच्या (उष्ण/थंड/पाऊस) चक्राचा सामना करावा लागतो, त्यामुळे भेगा निर्माण होतात.
- स्ट्रक्चर सेटलमेंटमुळे भेगा निर्माण होऊ शकतात.
- काँक्रीट न वाकणारे/ कडक असल्यामुळे ते अशा हालचाली सहन करू शकत नाही आणि त्यामुळे भेगा निर्माण होऊ शकतात.
- छताचा उतार जर योग्य नसेल तर त्यामुळे पाणी छताच्या खालच्या बाजूला साठून राहण्याची शक्यता असते.

## उपाय

## डॉ. फिक्सिट फास्टफ्लेक्स




## डॉ. फिक्सिट फास्टफ्लेक्सची निवड का करावी ?

- काँक्रीट आणि गवंडीकामाच्या पृष्ठभागांना उत्तम रीतीने चिकटते
- 1.2–1.5 मिमिचे जाड आवरण तयार होते त्यामुळे उत्तम वॉटरप्रूफिंग मिळते
- खूप लवचिक थर असून तो 120% पर्यंत ताणला जाऊ शकतो, त्यामुळे 2 मिमि पर्यंतच्या भेगा बुजवू शकतो.
- घातक नाही
- ब्रश, रोलर किंवा ट्रॉवेलने सहजपणे लावता येतो

## वापरण्याची पद्धत





### पायरी 1

याचा उपयोग करण्यापूर्वी काँक्रीटच्या पृष्ठभागाचे संपूर्ण क्युअरिंग झालेले असले पाहिजे (किमान 28 दिवस) व पृष्ठभाग नीट स्वच्छ केलेला असला पाहिजे. याचा वापर करण्यापूर्वी पृष्ठभाग नीट स्वच्छ करावा.




### पायरी 2

सर्व भेगा प्रायमिंगने (1 यूआरपी : 1 सिमेंट) दुरूस्त करा आणि मॉर्टारमध्ये **डॉ. फिक्सिट पिडिक्रीट यूआरपी** (सिमेंटच्या वजनाच्या 10%) घाला. सिमेंट व वाळू यांचे प्रमाण 1:3 असावे.





### पायरी 3

भिंत व जमीन जेथे मिळतात ती जागा (जंक्शन) स्वच्छ करा आणि सिमेंटने अँगल फिलेट /वट्टा तयार करा :
वाळू मॉर्टारचे प्रमाण 1:3 व त्यात **डॉ. फिक्सिट पिडिक्रीट यूआरपी** (सिमेंटच्या वजनाच्या 10%) मिसळून ते भिंत व जमीन जिथे मिळतात त्या ठिकाणी (जंक्शनवर) लावा.





### पायरी 4

**डॉ. फिक्सिट फास्टफ्लेक्स**चे 2 थर @5 चौ फूट/किग्रा यानुसार संपूर्ण जमिनीशी समतल (हॉरिझॉंटल) पृष्ठभागाला लावा व पॅरापेट वॉलवर फायनल फिनिश लेव्हलपासून 300 मिमि पर्यंत येऊ द्या. 150 मिमि रूंद 45 जीएसएम ग्लास फायबर मेश अँगल फिलेटच्या जागी ओल्या स्थितीत पहिल्या थरावर घाला. सर्व अतिरिक्त वॉल–फ्लोअर जॉइंटस पायरी 3–4 मध्ये वर्णन केल्यानुसार कव्हर करावेत.





### पायरी 5

100 जीएसएम जिओटेक्सटाइल क्युअर केलेल्या **डॉ. फिक्सिट फास्टफ्लेक्स** वर सेपरेशन लेयरच्या स्वरूपात घाला.





### पायरी 6

याच्यावर किमान 40–50 मिमि चे काँक्रीट स्क्रीड (1 सिमेंट : 1.5 वाळू : 3 ॲग्रीगेट) आणि त्यात मिसळा **डॉ. फिक्सिट पिडिप्रूफ एलडब्ल्यू +** (200 मिली सिमेंटच्या प्रत्येक पोत्यासाठी) आणि ड्रेन आऊटले–टमधून जाणारा उतार ठेवा.




### पायरी 7

3.25 मी x 3.25 मी चे कंट्रोल जॉइंटस करा.
28–30 दिवसांनंतर, हे जॉइंटस **डॉ. फिक्सिट पीयू सीलंट**ने भरता येतील.




### पायरी 8

वैकल्पिक : **डॉ. फिक्सिट न्यूकोट**चे दोन थर @10 चौ.फूट/लिटर/2 थर यानुसार लावा व डॉ. फिक्सिट न्यूकोट कूलचा एक थर @7 चौ.फूट/लिटर/थर यानुसार, पाणी घालून पातळ न करता लावा. ज्याचे सोलर रिफ्लेक्टन्स इंडेक्स (एसआरआय) मूल्य 106 असेल आणि ज्यामुळे कडक उन्हाळ्यात पृष्ठभागाचे तापमान 100 सें.** पर्यंत कमी होऊ शकेल.